# प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर जि. जळगाव

**शै.वर्ष -२०२१ -२०२२**

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर

## अहवाल

**दि. १० मार्च २०२२ ते १६ मार्च २०२२**

रढावण-राजोरे ता. अमळनेर, जि. जळगाव

कार्यक्रम अधिकारी
प्रा अवित आर. पाटील

प्र. प्राचार्य,
प्रा डॉ पी. आर.शिरोडे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व प्रताप महाविद्यालय (स्वायत्त),अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे विओशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर रढावण-राजोरे ता. अमळनेर येथे **१०/०३/२०२२ ते १६/०३/२०२२** दरम्यान आयोजित करण्यात आले

**दि.१० मार्च** रोजी प्रताप महाविद्यालय(स्वायत्त) अमळनेरच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक व कबचौ उमवी जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आज दत्तक गाव रढावण- राजोरे येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचे उद्धाटन करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी खा.शि.मंडळाचे चिटणीस प्रा.डॉ.ए.बी. जैन अध्यक्ष तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा.जी.एच.निकुंभ श्री. ढोमन पाटील, श्री.भिकन पाटील, श्री गंगाराम पाटील हे होते. कार्यक्रमाचे उद्धाटन माजी सैनिक शाम पाटील यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेला माल्यार्पण करून केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रम अधिकारी प्रा.अवित पाटील यांनी पुढील सात

दिवसात श्रमसंस्कार शिबिराचे नियोजन प्रस्तुत केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.ए. बी.जैन यांनी स्वातंत्र्याचा ७५व्या अमृत महोत्सवाचे व शिबिराचे महत्व विशद करून शिबिराला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा योगेश पाटील यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. भाग्यश्री जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला श्री शांताराम पाटील, श्री पुंडलीक काळे, श्री दौलत सूर्यंवशी, श्री आनंदा पाटील, श्री कन्हैयालाल सोनवणे, श्री ग्रामसेवक राहुल पाटील, श्री वसंत पाटील,मुख्याध्यापक श्री ग्रामसेवक राहुल पाटील यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाला उमवि रासेयो संचालक प्रा.डॉ.सचिन नांद्रे,जिल्हा समनव्यक प्रा. डॉ. मनीष करंजे, विभागीय समनव्यक प्रा.डॉ.संजय शिंगाणे यांनी प्रेरणा दिली.या कार्यक्रमाला गुरुदास कोळी, आकाश धनगर, निखिल पाटील, सारिका ढिवरे व सर्व स्वयंसेवकांनी मेहेनत घेतली.

दि.९/०३/२०२२ रोजी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसह राढावण-राजोरे येथे सायंकाळी पोहचलो. शिबीराचे ठिकाण जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, राढावण-राजोरे येथे साफसफाई केली व राहण्याची सोय केली,

प्रथम दिनी दि.१०/०३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता माजीसैनिक श्याम पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. हा कार्यक्रम झाल्यानंतर प्रेरणागीते घेण्यात आली. सात दिवसीय निवासी शिबीरादरम्यान साक्षरता, दारूबंदी, पर्यावरण, ग्लोबल वार्मिंग (जागतिक तापमानवाढ), हुंडाबळी, एड्स, व्यसनमुक्ती, सीभुण हत्या, मुलींची घटती संख्या, डिजिटल इंडिया तसेच मुद्रारहित व्यवहार कसा करावा इ. विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सात दिवसीय शिबीरात विविध मान्यवरांचे बौद्धिक सत्रात व्याख्याने आयोजित केली. यामध्ये प्रा.डॉ.जयेश गुजराथी (समन्वयक, IQAC, प्रताप महाविद्यालय, जमळनेर) - स्वच्छ भारत अभियान,प्रा.डॉ.व्ही.बी.माटे (जिल्हा समन्वयक, कबचौ-उमनि, जळगांव)-'राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तिमत्त्व विकास, प्रा.डॉ.व्ही.एस.तुटे (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) -'अंधश्रद्धा निर्मूलन, प्रा.नितीन पाटील (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) - 'कोरोना व माझगाव', प्रा.डॉ.एस.बी.नेरकर (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) - 'शिक्षण व आजचा तरुण, प्रा.लिलाधर पाटील (धनदाई महाविद्यालय, अमळनेर) महापुरुषांची आठवण, प्रा डॉ राहुल इंगळे(धनदाई महाविद्यालय, अमळनेर) - पर्यावरण व आरोग्य, प्रा डॉ योगेश तोरवणे (वाणिज्य विभाग प्रमुख ) ग्रामीण विकास ई बँकिंग, प्रा डॉ रमेश माने (मराठी विभाग प्रमुख)- कविता फुलते अशी,प्रा विजय साळुंखे (इतिहास विभाग, प्रताप महाविद्यालय,

अमळनेर)स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवइ. मान्यवरांनी शिबीरार्थी स्वयंसेवकांचे ग्रामस्थांचे प्रबोधन व मार्गदर्शन केले. .

सात दिवसीय निवासी शिबीरात कार्यक्रम पत्रिकेनुसार कार्यक्रम व उपक्रम राबविले. तसेच ग्राम स्वच्छतेसाठी विशेष मोहिम घेवून गावकऱ्यांच्या सहकायनि संपूर्ण गाव स्वच्छ केले. गावात प्रभात फेरी दररोज काढून गावातील ग्रामस्थांनाही मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी प्रयल केले. गावात प्रबोधन फेरी काढली. गावातील हागणदारी मुक्तीसाठी खास पथनाट्यव प्रबोधन केले. तसेच गावाची साफसफाई केली. राज्यशासन, केंद्रशासन व कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या समन्वयकाच्या मार्गदर्शनाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव विषयाला मध्यवर्ती ठेऊन हिवाळी शिबीर संपन्न झाले.

शिबिरा दरम्यान राढावण- राजोरे येथे सकलू ७ ते ११ च्या दरम्यान गावाच्या नैऋत्य कडील टेकडीवर CCT तयार करण्याचे श्रमदान केले दुपारच्या बौद्धिक सत्रानंतर सायंकाळी मैदानी खेळ घेण्यात आले व भोजनानंतर रात्री ८ ते ९.३० दरम्यान गावकऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमात अप्रतिम कलाकृती सादर करण्यात आले यांस सरपंच, उपसरपंच व लहान मुलांसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहत.रढावण व राजोरे गावांमध्ये स्वयंसेवकांनी सर्वेक्षण केले. रढावण व राजोरे गावातील घरांची एकूण संख्या ४००  असून रढावण व राजोरे गावाचे विविधांगी

सर्वेक्षण करण्यात आले. त्यात व्यायाम शाळा, सभागृह, शौचालय संख्या, अपंग व्यक्तींची संख्या, मतीमंद व्यक्तिची संख्या, निराधार व्यक्तिची संख्या, मतदार यादीत नाव नाही. गरोदर स्त्रिया कोरोना लसीकरण नवजात बालक संख्या, झाडांची संख्या, विजेचे खांब , पथदिवे इत्यादी गोष्टींचे सर्वेक्षण करण्यात आले

१६ मार्च रोजी रढावण- राजोरे गावात प्रताप महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचा समारोप झाला या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य पी आर शिरोडे तर प्रमुख अतिथी IQUAC समनव्यक प्रा डॉ जे आर गुजराथी, मा ढोमन पाटील, मा गंगाराम पाटील हे होते महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजनानंतर कार्यक्रम अधिकारी प्रा अवित पाटील यांनी ७ दिवसांमध्ये CCT, सर्वेक्षण, ग्रामस्वच्छता इतर केलेल्या कामांविषयीचेअहवाल वाचन केले जयेश सोनार, शेजल पाटील यांनी मनोगतातून सात दिवसात झालेला सकारात्मक बदल प्रकट केला अतिथी मनोगतातून मा ढोमन पाटील यांनी स्वयंसेवकांनी गावात केलेल्या कामाची स्तुती करून महाविद्यालयाचे आभार मानले अध्यक्षीय भाषणात प्राचार्य शिरोडे यांनी जलसंवर्धनासाठी ९८ CCT  केल्याबद्दल स्वयंसेवकांचे अभिनंदन केले जलसंवर्धनातून गावाला समृद्धीकडे नेता येईल असे प्रतिपादित केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा भाग्यश्री जाधव तर आभार प्रदर्शन प्रा योगेश पाटील  यांनी केले

संपूर्ण शिवीर यशस्वी होण्यासाठी खानदेश शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य उपप्राचार्य, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, वसतीगृह प्रमुख, विद्यार्थी व विद्यार्थीनींचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच खा.शि.मंडळाचे चिटणीस प्रा.डॉ.ए.बी.जैन, सर्व प्राचार्य, प्रा.डॉ.पी .आर.शिरोडे यांनीही मौलिक सहकार्य केले. राष्ट्रीय सेवा योजनेतील सत्लागार समितीचे सदस्य प्रा.डॉ.व्ही.बी.माटे तसेच विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.एस.बी.नेरकर व कबचौ-उमवि-रासेयोचे विभागीय समन्वयक मा.प्रा.डॉ.संजय शिंगाणे,जिल्हा समनव्यक प्रा डॉ मनीष करंजे व रासेयो संचालक मा सचिन नांद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

धन्यवाद,

आपले विश्वासू,